**ठळक बातम्या**

- आगामी जनगणनेसाठी सुमारे पावणे १२ हजार कोटी रुपयांच्या तरतुदीला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी

- देशात विमाननिर्मितीसाठी केंद्र सरकार पाठिंबा देणार, लोकसभेत पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरू

- ऑक्टोबर महिन्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना जानेवारीपासून देण्याचं राज्य सरकारचं आश्वासन

- चांदीच्या किंमती किलोमागे २ लाख रुपयांच्या पलीकडे

**आणि**

- माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील-चाकूरकर यांच्या निधनाबद्दल देशभरातून शोक व्यक्त

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळाने २०२७च्या जनगणनेसाठी ११ हजार ७१८ कोटी रुपयांच्या तरतुदीला मंजुरी दिली आहे. ही जनगणना दोन टप्प्यात केली जाणार असून ही जनगणना मालिकेतली १६वी आणि स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना असेल. यात जातनिहाय जनगणनेचा समावेश असेल, अशी माहिती, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत माध्यमांशी बोलताना दिली. ही जनगणना डिजिटल असेल असं वैष्णव म्हणाले....

**होल्ड... बाईट - अश्विनी वैष्णव**

या प्रक्रियेत ३० लाख क्षेत्रीय अधिकारी सहभागी होतील. या प्रक्रियेत प्रत्येक घराला भेट देणं, घरांची यादी आणि गृहनिर्माण जनगणना आणि लोकसंख्या गणनेसाठी स्वतंत्र प्रश्नावली तयार करणं यांचा समावेश असेल, असं वैष्णव म्हणाले.

खोबऱ्यासाठी १२ हजार २७ रुपये ते १२ हजार ५०० रुपये क्विंटल किमान हमी भाव केंद्रीय मंत्रीमंडळानं आज निश्चित केला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यात सुमारे साडे चारशे रुपयांची वाढ झाली आहे. मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहार विषयक समितीनं कोल सेतु या उपक्रमाला मंजुरी दिल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज मणिपूरमधल्या सेनापती जिल्ह्याला भेट देऊन १ हजार ३८७ कोटी रुपयांच्या सहा विकास कामांचं उद्घाटन तसंच पाच विकास प्रकल्पाची पायाभरणी केली. यात निवासी शाळांचा विकास, प्राथमिक आरोग्य केंद्रांचं अद्यावतीकरण, आरोग्य सेवा, शिक्षण या क्षेत्रातल्या आणि इतर प्रकल्पांचा समावेश आहे. सेनापती इथं पोहोचल्यावर राष्ट्रपतींनी मदत छावण्यांमध्ये आश्रय घेतलेल्या विस्थापितांशी संवाद साधला. त्यानंतर मणिपूरमधील असुरक्षित आदिवासी गटातील मारम या जमातीच्या नेत्यांशीही त्यांनी संवाद साधला. मणिपूरच्या आदिवासींसाठी प्रतिष्ठा, सुरक्षा आणि विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि देशाच्या प्रगतीत त्यांचा अधिकाधिक सहभाग सुनिश्चित करणे हे राष्ट्रीय प्राधान्य आहे. सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासासाठी भारत सरकार स्थानिक नेते, आणि समुदायांसोबत मिळून काम करत आहे, असं राष्ट्रपती म्हणाल्या.

**<><><><><>**

विमान वाहतूक क्षेत्राची  वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी देशात निर्मित विमानांची गरज असून, केंद्रसरकार देशात विमानांची निर्मिती करण्याचा कार्यक्रम सुरु करणार असल्याचं नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी आज लोकसभेत सांगितलं. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, रशियाच्या सुखोई

एसजे १०० या कंपनीच्या सहकार्यानं देशात विमान निर्मितीसाठी तंत्रज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करत असल्याचं ते म्हणाले.

केंद्रसरकारला आणीबाणीच्या परिस्थितीत हवाई प्रवासाचं भाडं नियंत्रित ठेवण्याचा अधिकार असून, सरकारनं अनेकदा या अधिकाराचा वापर केला आहे. तिकिट आरक्षित करताना प्रवाशांना दरपत्रक दाखवण्याचे निर्देश दिले आहेत, असंही त्यांनी सांगितलं. याशिवाय DGCA मध्ये तिकीटाच्या दरांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि हे दर निर्धारित मर्यादेत आहेत की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी यंत्रणा कार्यरत असल्याची माहिती त्यांनी दिली. उडाण योजनेचा लाभ आतापर्यं दीड कोटींहून अधिक प्रवाशांनी घेतला आहे. ३ नव्या कंपन्यांना याअंतर्गत परवानगी दिली असून आणखी दोघांनी अर्ज केल्याचं ते म्हणाले. वर्षा गायकवाड यांनी वाढते तिकिट दर, विमानतळ विकास शुल्कावर चिंता व्यक्त केली. इंडिगोच्या संकटाची न्यायिक चौकशी करावी अशी मागणी वैमानिकांच्या संघटनेनं केल्याचं के सी वेणुगोपाल म्हणाले. समाजवादी पक्षाच्या रमाशंकर राजभर यांनी त्याला पाठिंबा दिला.

**<><><><><>**

लोकसभेत आज २०२५-२६ साठी पहिल्या टप्प्यातल्या अनुदानांच्या पुरवणी मागण्यांवर आणि विनियोग विधेयक, २०२५ वर चर्चेला सुरुवात झाली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हे विधेयक चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी सभागृहात मांडलं. हे विधेयक आर्थिक वर्ष २०२५-२६ मधल्या सेवांसाठी भारताच्या एकत्रित निधीतून आणि अन्य स्रोतांद्वारे अतिरिक्त रकमेचा विनियोग अधिकृत करेल. यानुसार, एक लाख ३२ हजार कोटी रुपयांच्या एकूण अतिरिक्त खर्चासाठी संसदेची मंजुरी देखील आवश्यक आहे.

**<><><><><>**

देशातल्या रेल्वे अपघातांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये ९० टक्के घट झाली असून प्रवाशांची सुरक्षितता ही भारतीय रेल्वेची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात सांगितलं. दुर्घटना रोखण्यासाठी रेल्वे कर्मचारी, रेल्वे सुरक्षा दल, जीआरपी आणि नागरी पोलिस संयुक्तपणे ब्लॅक स्पॉट्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दुर्घटनाप्रवण, संवेदनशील भागांमध्ये गस्त घालत आहेत, तसंच लेव्हल क्रॉसिंगवर सुरक्षितता वाढवण्यासाठी आतापर्यंत दहा हजारांपेक्षा जास्त गेट्सवर इंटरलॉकिंग प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

खोट्या आणि बनावट बातम्यांना पायबंद घालण्यासाठी सरकारने कठोर उपाययोजना केल्याचं वैष्णव यांनी राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. विविध माध्यमांमधल्या अशा हानीकारक मजकूराविरोधात कारवाई करण्यासाठी नियमावली बनवण्यात आली आहे, असं वैष्णव म्हणाले.

<><><><><>

राज्यात ऑक्टोबर महिन्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई जानेवारी २०२६ पासून दिली जाईल, असं मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांनी आज विधानसभेत सांगितलं. भास्कर जाधव, सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत लक्षवेधी मांडली. एनडीआरएफच्या निकषानुसार मिळणाऱ्या मदतीशिवाय रब्बी हंगामासाठी प्रति हेक्टर अतिरिक्त दहा हजार रुपये मदत दिली जाणार आहे, असं जाधव म्हणाले.

राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात कापूस खरेदी केंद्रावर हेक्टरी कापूस खरेदी मर्यादा वाढवण्यात आली असून आता हेक्टरी २३ क्विंटल उत्पादकता निश्चित करून कापूस खरेदी केली जाणार असल्याचं पणन मंत्री जयकुमार रावल यांनी आज विधानसभेत सांगितलं. ही उत्पादकता मर्यादा फक्त खरीप हंगाम २०२५ मध्ये उत्पादित कापसासाठीच लागू असेल असं रावल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशातली अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचं श्रेय स्वातंत्र्यवीर सावरकर यांना कधीच मिळालं नाही, असा दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केला. ‘सागरा प्राण तळमळला’ या गीताला ११५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त अंदमान निकोबारची राजधानी श्री विजय पुरममध्ये झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या दौऱ्यात अमित शहा आणि सरसंघचालक मोहन भागवत यांनी सावरकरांच्या पुतळ्याचं अनावरण केलं.

**<><><><><>**

छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात आज दहा माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. यात सहा महिला नक्षलींचा समावेश आहे. या सर्वांवर ३३ लाख रुपयांचं बक्षिस जाहीर करण्यात आलं होतं. माओवाद्यांनी त्यांच्याकडील एके-४७, दोन एसएलआर रायफल, एक स्टेन गन आणि एक बॅरेल ग्रेनेड लाँचर आदी शस्त्रं पोलिसांकडे जमा केली.

**<><><><><>**

चांदीच्या दरांनी आज किलोमागे २ लाख रुपयांचा टप्पा पार केला. मुंबईच्या बाजारपेठेत कालच्या तुलनेत किलोमागे चांदी सुमारे ७ हजार महाग झाली आणि एक किलोसाठी २ लाख १ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागत होती.

२४ कॅरेट सोनं महाग होऊन तोळ्यामागे १ लाख ३६ हजार रुपयांच्या पलीकडे गेलं. २२ कॅरेट सोनं तोळ्यामागे सुमारे ३ हजार ९०० रुपयांनी महागलं आणि त्यासाठी १ लाख ३३ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागले.

**<><><><><>**

पीएम विश्वकर्मा योजने अंतर्गत नोंदणीकृत कारागिरांना ऑनलाइन बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी एमएसएमई, अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयानं आज नवी दिल्ली इथं अमेझॉन सेलर सर्व्हिसेस बरोबर सामंजस्य

करार केला. या करारानुसार, ई-कॉमर्स सेवा, पात्र  कारागीरांना आपल्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर प्रवेश देईल, तर त्यासाठी  आवश्यक मंजुरी, नोंदणी आणि परवाने मिळवून द्यायला एमएसएमई मंत्रालय सहाय्य करेल.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील-चाकूरकर यांचं आज पहाटे लातूर इथं निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. पाटील यांनी लोकसभेच्या सभापतीपदासह केंद्र सरकारमध्ये अनेक महत्त्वाची पदे भूषवली होती. लातूर मतदारसंघातून ते सात वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. पाटील यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी ११ वाजता लातूर शहराजवळील वरवंटी इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पाटील यांच्या निधनावर शोक व्यक्त केला. पाटील हे एक अनुभवी नेते होते. ते समाजाच्या कल्याणासाठी योगदान देण्यास खूप उत्सुक होते, असं प्रधानमंत्र्यांनी शोक संदेशात म्हटलं आहे. जनतेच्या सेवेसाठी पाटील यांचं योगदान कायम लक्षात ठेवलं जाईल, असं काँग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी लातुरात त्यांच्या पार्थिवाचं दर्शन घेतलं.

**<><><><><>**

इंडिगोच्या संचालक मंडळाने आज उड्डाणांमध्ये व्यत्यय येण्याच्या कारणांचं विश्लेषण करण्यासाठी विमान वाहतूक तज्ञाची निवड करण्याची घोषणा केली. संबंधित तज्ञ हा स्वतंत्रपणे या परिस्थितीचं पुनरावलोकन करून सविस्तर अहवाल सादर करेल.

//<><><><><>//